प्रेस नोट दि.१२/१०/२१८

**सॉप्टवेअर चे सोर्स कोड मध्ये अनधिकृत पणे बदल करून नवीन हुबेहुब सॉप्टवेअर तयार करून मार्केट मध्ये विकत असलेल्या के के मार्केट धनकवडी मधील ऑफिस मध्ये सायबर सेल ने टाकला छापा.**

शिवाजीनगर, पुणे येथील समकन्सेप्टस् टेक्नॉलॉजीज प्रा.लि. या सॉफ्टवेअर डेव्हलोपर कंपनीकडे इयत्ता १ ली ते १२ वी पर्यतचे विद्यार्थ्यासाठी शैक्षणीक क्षेत्रातील ई- लर्निंग सॉफ्टवेअरचे कॉपी राईट्सचे स्वामीत्व हक्क असताना धनकवडी येथील के के मार्केट मधील एका गाळ्यामध्ये याच सॉफ्टवेअरचे सोर्स कोड चोरून त्यामध्ये अनधिकृतरीत्या स्वताःचे आर्थिक फायद्याकरीता बदल घडवून त्याच सॉफ्टवेअर सारखे मिळते जुळते सॉफ्टवेअर तयार करून ते मार्केट मध्ये मुळ किंमतीचे पेक्षा कमी दरामध्ये विकत असल्याबाबत सायबर क्राईम सेल गुन्हे शाखा यांचे कडे ई- लर्निंग सॉफ्टवेअरचे कॉपी राईट्सचे स्वामीत्व हक्क असणाऱ्या समकन्सेप्टस् टेक्नॉलॉजीज प्रा.लि. या कंपनीने तक्रार अर्ज दिला होता.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सायबर सेल कडील पोलीस निरीक्षक संतोष बर्गे, यांनी अर्जचौकशी दरम्यान सदर बाब पडताळली असता सदर तक्रार अर्जामध्ये तथ्य असल्याचे आढळून आले. त्यामुळे दि. ११/१०/२०१८ रोजी के.के. मार्केट डी-९१ दुसरा मजला येथिल पॅन गुरु सिस्टीम चे कार्यालयामध्ये सदरचे सॉफ्टवेअर खरेदी करण्यासाठी बनावट ग्राहकासोबत रोख रक्कम व एक डोंगल तसेच साध्या वेषामधील पोलीस असे पाठविले. त्यानंतर नमुद कार्यालयामधील उपस्थित असणारे इसम नामे महेश सोपान पवार यांनी बनावट ग्राहकास सदरचे सॉफ्टवेअर ७५००/- रूपयांचे बनावट ग्राहकाचे जवळ असलेल्या डोंगल मध्ये लॅपटॉप व्दारे इन्स्टॉल करून दिले. त्यानंतर बनावट ग्राहकाने इशारा करताच सदर कार्यालयामध्ये छापा टाकून एक डोंगल, लॅपटॉप, पेन ड्राईव्ह, रोख रक्कम रूपये ७५००/-, सॉफ्टवेअर खरेदी केल्याचे बिल, तसेच दोन हार्डडिस्क असा मुद्येमाल जप्त करून सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर २८१/२०१८ भादवि कलम ४२०,३४, सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६५, ६६ तसेच कॉपी राईट ॲक्ट कलम ६३ अन्वये सदर कंपनीचे प्रोप्रा. महेश सोपान पवार व संतोष रतन गोसावी यांचे विरोधात समकन्सेप्टस टेक्नॉलॉजीज प्रा.लि. कंपनीचे मालक नामे बिरेन धरमसी यांनी फिर्याद दिल्याने दाखल करण्यात आला.

सदर कारवाई ज्योती प्रिया सिंह, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर सहा. पोलीस आयुक्त आवसा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधीका फडके, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक - संतोष बर्गे, सायबर क्राईम सेल, कर्मचारी नितेश शेलार, संतोष जाधव, प्रसाद पोतदार यांचे पथकाने केली